# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०४/१२/२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१७) इतिवृत्त

**गुरूवार,** दिनांक **०४ डिसेंबर २००८ रोजी** स्थायी समितीची सभा, माननीय सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **"मलीक अंबर स्थायी समिती सभागृह"** येथे **दुपारी १२-२० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला उप आयुक्त(प्र.) श्री.एम.वाय.कांबळे, नगर सचिव श्री. एम. ए. पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
२. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
३. सौ. अल्पा विकास जैन
४. श्री. संजय रामदास जोशी
५. श्री. रविकांत गवळी
६. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
७. श्री.जावेद हसन खान
८. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
९. श्री. कचरू सोनवणे
१०. श्री. कचरू मोरे
११. श्री. सिताराम सुरे
१२. श्री. नारायण कुचे

**<u>संवाद :</u>**

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : स.सदस्या सौ.मंगला गायकवाड यांचे सासरे स्व.श्री.काशिनाथ श्रावण गायकवाड यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले आहे त्यांना सभागृहातर्फे श्रंध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.जावेद हसन खान :यास माझे अनुमोदन आहे.

मा.सभापती : सर्वांनी श्रध्दाजंलीसाठी उभे रहावे.
(या वेळी स्व.काशिनाथ श्रावण गायकवाड यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

श्री.सतीष कटकटे : नवीन अधिकारी कोण आलेले आहे परीचय करून द्यावा.

मा.सभापती : उपआयुक्त पदी नवीन अधिकारी आलेले आहेत त्यांनी आपला परीचय द्यावा.

श्री.रविकांत गवळी : गेल्या १५ दिवसात प्रशासनाने बरेच अधिकारी, कर्मचारी यांचे फेरबदल केलेले आहे. हे सर्व वृत्तपत्राच्या माध्यमातून आम्हाला माहिती

मिळते.कोणते अधिकारी कोणत्या विभागात आहे तसेच नवीन उपआयुक्तपदी आलेले यांचाही परीचय करून द्यावा.

उपआयुक्त (सिडको): माझे नाव बी.डी सोनवणे, मी एरंडोल येथे मुख्याधिकारी या पदावर कार्यरत होतो. माझी २८ वर्षांची सेवा झालेली आहे. यापूर्वी मी जळगांव, पाचोरा, वाशीम, विदर्भात सेवा केलेली आहे. दि.२६/११/२००८ पासून माझी महापालिकेमध्ये उपआयुक्तपदी नियुक्ती झालेली आहे उपआयुक्त (सिडको) चार्ज घेतलेला आहे.

श्री.सिताराम सुरे :सर्व्हे नं.१९४/१ सलीम ले-आऊट ही महानगरपालिकेची खुली जागा असतांना ३१-३-२००८ रोजी स्थायी समितीच्या सभेत ऐनवेळी विषय मंजूर करण्यात आला इतिवृत्त कायम करण्यास आले त्यावेळी मी विरोध केला व तो ठराव रद्द करण्यासाठी तसा प्रस्ताव प्रशासनाने सादर करावा असे आपण आदेश केले होते.ती जागा मुलांना खेळण्यासाठी वयोवृध्द लोकांना बसण्यासाठी ठेवावी तसे पत्र तेथील नागरीकांनी माझेकडे दिले त्या अनुषंगाने आपणाकडे मी पत्र दिले मागिल बैठकीत आपण हा प्रस्ताव ठेवण्याचे प्रशासनास आदेशीत केले होते आजच्या विषयपत्रिकेवर हा ठराव आलेला नाही तो आणावा त्यास रद्द करावे नसता ही सभा तहकूब करावी.

मालमत्ता अधिकारी :मा.स्थायी समितीने ३१-३-२००८ रोजी ठराव क्र.४९५ नुसार दर्शनी हेल्थक्लबला ही जागा देण्यास मान्यता प्रदान केली होती.

मा.सभापती :प्रस्ताव शासकीय की अशासकीय होता.

श्री.सिताराम सुरे :ठराव अशासकीय होता असे वाटते जागा महापालिकेच्या ताब्यात होती असे असतांना अशी खुली जागा देता येते का ?

मालमत्ता अधिकारी :उपआयुक्त (म) यांचे मार्फत प्रशासकीय प्रस्ताव ठेवलेला होता.

श्री.संजय जोशी : नगररचना विभागाच्या बायलॉज नुसार महानगरपालिकेची खुली जागा जी सोसायटीची ओपनस्पेस आहे ती नियमानुसार कशासाठी देता येते.

मालमत्ता अधिकारी :नगररचना विभागाकडून माहिती घेवून खुलासा दिला जाईल.

श्री.रविकांत गवळी : स.सदस्य श्री. सिताराम सुरे हे तीन महिण्यापासून या जागेच्या संदर्भात प्रश्न मांडतात. जाधववाडी भागात सर्वे नं.१९४ मध्ये एक लेआउट मंजूर केला लेआउट मंजूर करतांना १० ते १५ टक्के ओपनस्पेस सोडण्यात येते.त्या जागेचा वापर तेथील लेआउट धारकच तो ही विशिष्ट प्रकारेच करू शकतात कायमस्वरूपी नाही असे असतांना तेथील जागा ही २९ वर्षासाठी व्यायामशाळेला देण्यात यावी. प्रशासकीय प्रस्ताव येतो हे बरोबर नाही यासाठी तेथील स्थानिक लोकांची सहमती असणे आवश्यक होते १५ पैकी १२ लोकांचा विरोध असतांना देखील प्रशासकीय ठराव असल्याने आपण मंजूर केला आता वस्तुस्थिती समोर आली असा ठराव करता येत झालेला ठराव रद्य करावा जागा महापालिकेच्या ताब्यात घ्यावी.

मा.सभापती : लेआऊट मधील खुली कशासाठी व कुणाला देता येते का खुलासा करावा.

शहर अभियंता : या विभागाचा मी २-३ दिवसापुर्वीच चार्ज घेतला आहे. अभ्यास करून माहिती दिली जाईल.

श्री.संजय जोशी :यापुर्वी या विभागात काम केलेले काही अधिकारी सभागृहात आहे त्यांचेकडून खुलासा घ्यावा.

कार्य.अभियंता (पा.पु) :रेखांकनधारकाच्या सम्मतीशिवाय अशी जागा देता येत नाही.

श्री.संजय जोशी :याचा अर्थ तेथील लोकांवर अन्याय केला. हा अन्याय प्रशासन करत असेल तर दुर्देव आहे.

मा.सभापती :ठराव क्र.४९५ हा रद्द करण्यासाठी तसा प्रस्ताव प्रशासनाने सादर करण्या संदर्भात स.सदस्य श्री. सिताराम सुरे हे तीन महिण्यापासून मागणी करीत आहे.अदयाप ठराव आलेला नाही खेदाची बाब आहे

श्री.संजय जोशी : कायदयाने तो ठराव झालाच नाही अशी जागाच देता येत नाही त्यामूळे रद्द करावा तसे संबधीत विभागाने आपल्याला व स.सदस्य यांना आज सध्याकाळ पर्यत कळविण्याचे आदेशीत करावे.

मा.सभापती :विषय क्र.४९५ जो सर्वे क्र. १९४/१ मयुरपार्क या बाबत दिं. ३१-३-२००८ रोजी मंजूर झालेला स्थायी समितीचा ठराव रद्द करण्यात येतो.या बाबतची लिखित माहिती या समितीचे सदस्य श्री.सिताराम सुरे व इतर सदस्यांनी केलेली असल्याने हा ठराव तात्काळ रद्द करण्यात येवून या बाबतची माहिती तात्काळ सभापती व त्या वार्डाचे स.सदस्य श्री सिताराम सुरे यांना देण्यात यावी.

सौ.अल्पा जैन :माझ्या वार्डात कचरा उचलण्यासाठी रिक्षा लावण्यात आलेल्या होत्या संबधीतास पेमेंन्ट न दिल्याने त्या बंद झाल्या सध्या वार्डात अनेक ठिकाणी कचरा तसाच पडून आहे उचचला जात नाही त्वरीत रिक्षा सुरू कराव्यात.

श्री.सतिष कटकटे :खाजगी एजन्सीला स्वच्छतेचे दिलेले काम बंद केले संबधीत ठेकेदाराने त्याची सर्व यंत्रना घेवून गेले आता महापालिकेच्या वतीने स्वच्छता करीत आहोत..कर्मचारी यांना टोपले, फावडे ,हातगाडया ट्रॉली रिक्षा उपलब्ध करून देण्याची वारंवार मागणी केली अदयाप दिले नाही.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा

प्रकल्प संचालक : प्रभाग ड मध्ये एकुण ६४ घंटागाडया आहेत.

श्री.सतीष कटकटे : जुन्या की नव्या आहे नवीन किती खरेदी केल्या यात महापालिकेच्या किती ठेकेदाराच्या किती याचाही खुलासा दयावा.

प्रकल्प संचालक :नवीन घंटागाडया अदयाप खरेदी केलेल्या नाही.जुन्या ज्या आहे त्या कुणाच्या आहे हे याची चौकशी करावी लागेल तसेच ९ ट्रक आहे मिनी ट्रक्स व टॅक्ट्रर किती दिले याची माहिती सध्या माझेकडे नाही.वार्ड अधिकारी यांचेकडून माझेकडे प्रस्ताव आला होता. त्यांनी कचरा उचलण्यासाठी काही ॲटोरिक्षा लावलेल्या आहेत.त्या ॲटो रिक्षा पुर्वी ठेकेदाराच्या होत्या त्याच ठेवलेल्या आहेत.स.सदस्य सौ.अल्पा जैन यांचे वार्डातील रिक्षा बंद करण्यात आल्या की नाही याची कल्पना नाही रिक्षा बंद केल्याचा रिपोर्ट माझेकडे आलेला नाही.

श्री.सतिष कटकटे :ॲटो रिक्षा लावतांना त्यांना ऑर्डर दिली असेल ती दाखवावी.

प्रकल्प संचालक :तशी ऑर्डर दिलेली नाही.

श्री.सतीष कटकटे : ऑर्डर दिलेली नसतांना रिक्षा कशा चालू होत्या रिक्षा कुठला कचरा उचलला जात असे हे सुध्दा माहित नाही आतापर्यंत रिक्षा चालू होत्या त्यांचे पेमेन्ट कोण देणार आहे.

प्रकल्प संचालक : प्रभाग अधिकारी यांना त्या रिक्षा लावण्याची ऑर्डर दिलेली नव्हती.

श्री.सतीष कटकटे : महिण्याला १८ लक्ष स्वच्छतेवर खर्च होतो. अधिका-यांच्या तोंडी आदेशानुसार रिक्षा लावण्यात आल्या. तीन महिणे् झाले १ लक्ष पर्यंत पेमेन्ट झाले. म्हणून रिक्षा बंद झाल्या.माझे माहिती प्रमाणे चार सुध्दा घटांगाडया महापालिकेच्या नाही ठेकेदाराच्या चालू आहे त्याचे सुध्दा पेमेंन्टची मागणी होत आहे.

श्री.रविकांत गवळी :रिक्षा बंद झाल्यामूळे कचरा उचलला जात नाही त्या चालू करण्यासाठी काय निर्णय घेता येईल तो घ्यावा.

अति.शहर अभियंता : स्थायी समितीच्या निर्णयानूसार खाजगी एजन्सीकडील कचरा उचलण्याचा ठेका रद्द केले. प्रभाग समिती ड मध्ये तीन ठेकेदार काम होते त्याचे काम थांबविले. त्यांची यत्रंणा ते पूर्ण घेवून गेले.त्यामूळे लगेच ६ ट्रक ३० हातगाडया या वार्ड कमेटी साठी उपलब्ध करून दिल्या.ज्या रिक्षा लावल्या त्या वार्ड अधिकारी यांनी त्यांचे अधिकारात तीन महिण्यापूर्वी रिक्षा लावल्या तो प्रस्ताव तेंव्हा या विभागात येण्या ऐवजी ४-५ दिवसापूर्वी आला.रिक्षा लावतांना संबधीत अधिकारी यांनी पुर्वपरवानगी घ्यायला पाहिजे होती.

श्री.रविकांत गवळी : वार्ड अधिकारी हे वार्डात जावून वस्तुस्थितीची पाहणी करतात.आताच खुलासा केला ६ मोठे ट्रक दिले लहान गल्यामध्ये ही वाहने जात नसल्याचे रिक्षा लावणे गरजेचे होते. वॉर्ड-अ ची पाहणी केली. छोटे रिक्शा लावणे आवश्यक होते.

अति.शहर अभियंता :रिक्षा लावतांना वार्ड अधिकारी यांनी वरिष्ठांची पुर्व परवानगी घेणे गरजेचे होते.

श्री.सतीष कटकटे :मोठे ट्रक उपलब्ध करून दिले रिक्षा का दिल्या नाही.तीन खाजगी ट्राली रिक्षा लावल्या वार्ड अधिकारी यांना कुणी आदेश दिले होते.

अति.शहर अभियंता :रिक्षा लावण्याला दुमत नाही तीन महिणे थांबवून नंतर प्रस्ताव वरीष्ठाकडे येतो हे योग्य नाही.ज्यांचे रिक्षा होत्या त्यांना बंद करण्याचे आजही आदेशीत केले नाही त्यांनी स्वत:च बंद केलेल्या आहे.

श्री.सतीष कटकटे :ज्यांनी रिक्षा लावल्या त्यांची तेथून बदली होते. आता पेमेंन्टचा प्रश्न निर्माण झाला तीन महिणे कुणी थांबणार नाही.

अति.शहर अभियंता :रिक्षा लावल्या बाबत प्रस्ताव आलेला आहे. २-३ दिवसात मा.आयुक्तांची मंजूर घेवून कार्यवाही केली जाईल.

मा.सभापती :दोन दिवसात ट्रॉली रिक्षा सुरू करण्यात यावे.

श्री.सतिश कटकटे :आरोग्य विभागामार्फत कच-यासाठी किती गाडया खरेदी केल्या नवीन घेतल्या असेल तर वार्ड ड कार्यालयासाठी दिल्या नाही चार डस्टबिन असलेली एक सायकल रिक्षा दिली.किती गाडया खरेदी केल्या माहिती दयावी.

मा.सभापती :वार्ड कार्यालय अ ते फ मध्ये एकूण ३७ मोठे ट्रक, मिनी ट्रक ८, ट्रॉली रिक्षा ५ उपलब्ध करून दिल्या त्यातील वार्ड ड कार्यालयास ९ ट्रक दिले

जे नवीन गाडया आल्या त्या दोन दिवसात उर्वरीत ठिकाणी उपलब्ध करून देण्यात यावे.

श्री.सतिष कटकटे :डस्टबीन रिक्षा,सायकल रिक्षा व इतर किती गाडया व किती रक्कमेच्या खरेदी केल्या याची माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :संबंधीत अधिकारी यांनी पुढील बैठकीत या संबधीची सविस्तर माहिती सादर करावी.

श्री.नारायण कुचे :महापालिकेचे निलंबीत कर्मचारी श्री.जैस्वाल यांनी मुकुंदवाडी येथे अतिक्रमण केलेले आहे या संदर्भात वारंवार चर्चेला विषय येवून ते काढण्याचे आदेशीत करण्यात आले संबधीत अधिकारी यांना ही मी स्वतः भेटलो अदयाप कार्यवाही केलेली नाही.

प्रशासकीय अधिकारी :अतिक्रमण काढण्याचे आदेश वार्ड अधिकारी यांना दिलेले आहे. ज्या स.सदस्यांच्या तक्रारी असतील व इतर तक्रारीनुसार अतिक्रमण काढण्याचे त्या त्या अर्जावर वार्ड अधिकारी यांना सुचना दिलेल्या आहे.

श्री.नारायण कुचे :नगररचना विभागाकडून त्या संदर्भात काय कार्यवाही केली.

श्री.रविकांत गवळी :वार्ड अधिकारी यांना नुसते अधिकार देवून प्रश्न सुटणार नाही त्यांना इमारत निरीक्षक, मजूर, गाड्या देणे आवश्यक आहे. ते त्यांना मिळाले का? मिळाले नसेल तर कसे करणार. त्यांचे म्हणणे आहे, जोपर्यंत हे मिळत नाही तोपर्यंत काढता येणार नाही.

शहर अभियंता :वार्ड अधिकारी यांचेकडे इमारत निरीक्षक दिले हा विभाग सक्षम करण्यासाठी आणखी कर्मचारी देण्याची गरज आहे.काही कर्मचारी हे निवडणुकीच्या कामासाठी गेलेले आहे त्यामुळे वार्ड अधिकारी यांना अतिक्रमण काढण्यास अडचण येत असेल.अतिक्रमण आजपर्यत काढायला पाहिजे अतिक्रमण काढण्याचे काम संथ गतीने होत आहे असे दिसते.२-३ महिण्यापूर्वीच वार्ड अधिकारी यांना आदेशी केलेले आहे.

श्री.संजय जोशी :यापूर्वी वार्ड अधिकारी यांचेकडेच हे काम होते. त्यांचेकडे कर्मचारी गाडया जेसीबी नाही म्हणून सेन्ट्रलाईज करण्याचे ठरविले. एक सिडको व एक शहर असे दोन भाग करण्याचे ठरविले होते.प्रशासनाने पुन्हा वार्ड अधिकारी यांचेकडे ते काम दिले.स.सदस्य श्री. नारायण कुचे हे सहा महिण्यापासून मुकूंदवाडी येथील अतिक्रमण काढण्या विषयी बोलत आहे. पावसाळा असल्यामूळे काढाता येत नाही असे उत्त्तर त्यांना मिळाले आता पावसाळा संपला केंव्हा काढणार आहे निश्चित तारीख प्रशासनाने द्यावी. १०-१५ दिवसानंतरची तारीख द्यावी.

शहर अभियंता :दिनांक २०-८-२००८ रोजीच वार्ड अधिकारी यांचेकडे जबाबदारी दिलेली आहे. प्रशासकीय अधिकारी हे सेवानिवृत्त झाल्याने जो प्रशासकीय विभाग हा अतिक्रमण विभाग म्हणून वेगळा होता तो जवळपास बंद झालेला आहे.वार्ड अधिकारी यांना कर्मचारी किंवा इतर विभागाकडे मागणी करावी ही सर्व जबाबदारी वार्ड अधिकारी यांची आहे प्रशासकीय प्रमुख म्हणून केलेला आहे.

श्री.संजय जोशी : केंव्हा काढणार निश्चित तारीख द्यावी. आपण विभाग प्रमुख आहात.

शहर अभियंता : आपण सुचना कराल त्याप्रमाणे ते काढण्याची कार्यवाही होईल.

श्री.नारायण कुचे : श्री. शेटे साहेब यांनी ३० सप्टेंबर पावसाळा संपल्यावर काढण्यात येईल असे पत्र देवून कळविले त्याची प्रत सुध्दा आपणाकडे देतो.

प्रशासकीय अधिकारी यांनी सुध्दा १५ दिवसाच्या आत कार्यवाही करण्याचे म्हटले होते अद्याप अतिक्रमण का काढले नाही.

शहर अभियंता : अतिक्रमण काढण्याबाबत वार्ड अधिकारी यांनी नियोजन करावे त्यांना सुरक्षा यंत्रणा, तसेच जी यंत्रसामुग्री लागेल ती दिली जाईल.वार्ड अधिकारी यांनी कार्यवाही न केल्यास मा.सभापती व आपल्या सर्वांच्या सम्मतीने कार्यवाही केली जाईल.

श्री-नारायण कुचे : त्या बाबतीत नियोजन कोण करणार आहे.आपण त्या विभागाचे विभाग प्रमुख आहात.

शहर अभियंता : या बाबतीत नियोजन करण्या संबधी वार्ड अधिकारी यांना लिहिलेले आहे. ज्या काही तक्रारी आहे त्या बाबतीत या विभागास कळवावे.ते कळवित नाही त्या बाबतीत माहिती घेतली जाईल तारीख वाईज नियोजन करून  कार्यवाही होईल तसे आपणांस कळविले जाईल. एक महिन्यात काढू.

श्री.नारायण कुचे : वार्ड अधिकारी यांनी अतिक्रमण काढले नाही तर काय कार्यवाही करणार आहे .किती दिवसात अतिक्रमण काढणार आहात.

शहर अभियंता : सभागृह जे ठरविल ती कार्यवाही त्या वार्ड अधिकाऱ्यावर केली जाईल. एक महिण्याच्या आत सदरचे अतिक्रमण काढले जाईल.

श्री.कचरू सोनवणे :यापूर्वी दारीद्ररेषेखालील नागरीकांना प्रमाणपत्र देण्याचे काम चालू होते ते सध्या बंद आहे. ते वाटप करण्याची जबाबदारी कुणावर दिलेली आहे.

मा.सभापती : या बाबतीचे काम नवीन अधिकारी श्री. सुर्यवंशी आलेले आहे त्यांनी त्याचा परीचय व या संबधी खुलासा द्यावा.

प्रकल्प संचालक(सुजशरो) : माझे नाव देवेंद्र सुर्यवंशी प्रकल्प संचालक (सुजशरोयो) या योजनेसाठी या महापालिकेत दि. २२-८-०८ पासून माझी नियुक्ती झालेली आहे. सन २००५-०६ मध्ये बीपीएल कुटूंबाचा सर्वे करण्यात आला अंतिम यादी झाल्यानंतर त्या कुटूंबांना दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार मा.आयुक्त यांनी दिं. २०-१०-२००८ रोजी प्रभाग अधिकारी यांना दिले. त्यानुसार प्रमाणपत्र देत आहे काहीं प्रभाग अधिकारी यांनी देण्यास सुरूवात केली प्रमाण पत्राचा नमुना यापूर्वी त्यांचेकडे दिला होता जो प्रमाणपत्राचा नमुना शासनाकडून येण्याच्या अगोदर महापालिकेने तयार केला होता आता कोणत्या नमुन्याचे प्रमाणपत्र द्यायचे. महानगरपालिकेच्या किंवा शासनाच्या नमुन्यात हा प्रश्न पडला. एक दोन दिवसात या बाबतीत योग्य तो निर्णय घेवून कार्यवाही केली जाईल.

श्री.कचरू सोनवणे :या शहरात संजय गांधी निराधार योजनेचे ६ हजार लाभार्थी आहे. येत्या २० तारखेला संजय गाधी निराधार योजनेच्या संदर्भात बैठक असून यापुढे आचारंसहिता लागल्यास बैठक होणार नाही. श्रावणबाळ योजना तसेच संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्यांनी अर्ज केले त्यांना दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र असल्याशिवाय त्यांचे अर्ज मंजूर होणार नाही असा शासनाचा जीआर आलेला असून महापालिकेलाही प्राप्त झालेला आहे. त्यासाठी २-४ दिवसात या संबधी कार्यवाही करावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : महापालिकेने किती प्रमाणपत्र छपाई केलेले आहे.

श्री.कचरू सोनवणे : या प्रमाणपत्रासाठी महापालिकेने छपाईसाठी किती खर्च केलेला आहे.

मा.सभापती : शासनाकडून येण्या अगोदर महापालिकेने किती नमुना प्रमाणपत्राच्या प्रती छापलेल्या आहे व त्यावर किती खर्च झाला.

प्रकल्प संचालक (श्री.जावरे) :ज्यांची यादीत नावे आहे त्यांना प्रमाणपत्र दयावे असे शासनाचे आदेश होते. शासनाकडे नमुना प्रमाणपत्र प्रत पाठवली होती शासनाकडून उत्तर येण्यास उशीर होत असल्याने लोकांची गैरसोय होवू नये म्हणून नमुना प्रमाणपत्राच्या प्रती छापून प्रत्येक वार्ड कार्यालयाकडे जवळपास ५००० पर्यत प्रती दिलेल्या आहे किती छापाई केल्या संचिका बघून माहिती दिली जाईल.शासनाने आलेल्या नावाची सीडी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दिली या यादीतील नावे बघून संजयगांधी निराधार श्रावणबाळ योजनेसाठी प्रमाणपत्र म्हणून वापरू शकता.स.श्री.तकीहसन खान यांचेशी चर्चा करून सीडीतील नावे बघून या योजनेचा लाभ त्या त्या लोकांना देवू शकतो.शासनाने निर्धारीत केलेली नावाची यादी संगणकामध्ये नोंद केली संगणक ऑपरेट करून त्या लोकांना प्रमाणपत्र देता येईल.

मा.सभापती : प्रशासनाने २० तारीख ठेवलेली आहे. गोरगरीबांचा प्रश्न आहे तोपर्यत सर्वांना प्रमाणपत्र देवू शकतो का?

प्रकल्प संचालक(श्री.जावरे) : प्रत्यक्षात यादीची सीडीच सादर केलेली आहे.

श्री.कचरू सोनवणे : वार्ड कार्यालयात कामाचा व्याप जास्त असल्यामूळे प्रमाणपत्र देण्यासाठी कुणाचीही नियुक्ती केलेली नाही त्यामूळे अनेक नागरीकांना परत यावे लागते.

श्री.संजय जोशी :शासनाकडून येत नाही नागरीकांची गैरसोय होते म्हणून नमुना प्रमाणपत्राची छपाई केली चुक केलेली नाही.आता शासनाकडून आलेल्या नमुना प्रमाणपत्रानुसार वाटप करण्यात यावे.

श्री.सतीष कटकटे :शासनाकडून नमुना प्रमाणपत्र कोणत्या तारखेला आलेले आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :संगणकात लोड केल्याप्रमाणे वाटपास सुरूवात करावी किती छपाई केले खर्च किती झाला याची माहिती पुढील बैठकीत दयावी.

श्री.मोहन मेघावाले :वार्ड कार्यालय ब येथे प्रकल्प संचालक यांनी या विषयी लगेच कार्यवाही होईल असे म्हटले होते त्यास दीड महिना झाला २० तारीख निघून गेल्यावर त्या गरीब लोकांना फायदा होणार नाही.सीडी मध्ये सर्व नावे एकत्रित आहे ते शोधण्यास वेळ लागतो नागरीकांना त्रास होतो. वार्ड वाईज केल्यास सोयीस्कर व ताबडतोब वाटप होतील.

श्री.कचरू मोरे : प्रकल्प विभागाचा कामकाज व्यवस्थीत नाही. त्यांचेवर अंकुश नाही. दारिद्र्य रेषेचा सर्व्हेचा कार्यकाळ संपतो. सात महिणे झाले प्रभाग अधिकारी यांना आदेश दिले परंतू अद्याप दारिद्र्यरेषेचे प्रमाणपत्र वितरीत केले नाही. दारिद्र्य रेषेचे कामाप्रमाणेच बचत गटाची अवस्था. अभिलेख मुख्य कार्यालयात आहे किंवा डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रात आहे. वितरणासाठी ताबडतोब मार्ग काढावा. उडवाउडवीची उत्तरे मिळतात. त्यामुळे गोरगरीबांची हेळसांड होते. प्रभाग अधिकारी यांचेवर विसंबुन राहू नये. त्वरीत या विभागाने

प्रमाणपत्र द्यावे. तसेच शासनाकडून लाखोंचे अनुदान बचत गटासाठी येते. एकही बचत गट सक्षमपणे चालतो का? असेल तर तसा खुलासा करावा.

श्री.नारायण कुचे :शासनाकडून उशीरा माहिती आल्याने प्रमाणपत्र वाटप होवू शकले नाही येत्या २० तारखेच्या आत ते देण्याचे आदेशीत करावे.

श्री.संजय जोशी :वार्ड कार्यालयात संगणक,प्रिंटर ,सीडी दिली क.लिपीक ऑपरेटर काम सध्या करतात एक व्यक्तीला दोन मिनिटात प्रमाणपत्र देवू शकतात त्यांचेवर जबाबदारी सोपवावी ताबडतोब प्रमाणपत्र देण्याचे आदेशीत करावे आजच्या आज तसे आदेश काढून एकही तक्रार येणार नाही याची दखल घ्यावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :संगणक चालविण्याचा अनुभव असलेले कर्मचारी १५ दिवसासाठी वार्ड कार्यालयात प्रमाणपत्र देणेसाठी तात्तपुरते नियुक्त करावे सिडकोच्या कार्यालयातून हे प्रमाणपत्र देणे चालू आहे.

उपआयुक्त (प्र.) : दोन प्रमाणपत्राचे नमुने आहे त्याची तपासणी केली शासनाने जो नमुना दिला त्यात वार्ड अधिकारी यांना अधिकार प्रदान केले.त्यानुसार प्रभाग अधिकारी यांनीच हे काम करणे बंधनकारक आहे दोन दिवसापूर्वी तसे आदेश दिले दोन दिवसात काम सुरू होईल. दोन दिवसात आवश्यक स्टाफ देऊ.

श्री.रविकांत गवळी :शहरातील २००८ पर्यत जेवढया ओंपनस्पेस व सिडको भागातील ओपनस्पेसवर भुखंड मालकाने अतिक्रमण करण्यास सुरूवात केली दि.१/४/२००६ ला सिडको हस्तांतरण झाले. महापालिकेच्या रेकॉर्डवर त्या जागा आलेल्या आहे. माझे वार्डातील ओपनस्पेसवर काही लोकांनी वक्फ बोर्डचे कागदपत्र दाखवले व एक दोन रूमचे बांधकाम केले. ते प्रशासनाने काढले परंतु संबधीतानी अपील केले. मा.न्यायालयात त्यांचे बाजूने निकाल लागला. सिडकोच्या मालकीचे असलेले भुखंडाचे कागदपत्र सादर केल्याशिवाय व ते सिध्द होत नाही तोपर्यंत कार्यवाही होणार नाही. सिडको हस्तांतरण झाले तेंव्हा अर्धवट जागेचे नकाशे घेतले पुर्ण डाटा महापालिकेकडे आलेला नाही. या बाबत वारंवार मी सुचना केली की सिडकोकडील एन १ ते एन-१३ भागातील अशा जागा उदयाने हे सिडकोच्या मालकीहक्का बाबतचे पुरावे महापालिकेने घेण्याचे नवीन उपआयुक्त यांना आदेशीत करावे जेणे करून सदर जागा हया महापालिकेच्या मालकीच्या राहतील.

मा.सभापती : सिडको हडको मधील एन १ ते एन -१३ मधील ओपनस्पेस उदयाने व इतर ही ज्या ज्या जागा सिडकोने महापालिकेला हस्तांतर केल्या आहेत त्याची यादी तयार करून त्या बाबतचा ताबा महापालिकेचा आहे किंवा नाही याची माहिती येणाऱ्या स्थायी समितीमध्ये सादर करावी.

श्री.कचरू सोनवणे घरकुलाचे काम चालू करण्यासाठी उपोषण सुरू केले होते चार-आठ दिवसात काम सुरू होईल आपण आश्वासन दिले अदयाप झालेले नाही. जी घरे झाली तेथे कुत्रे , मांजर इतर जनावरे घाण करीत आहे या बाबतीत काय निर्णय घेणार आहे .

उपअभियंता(स्लम) :१५ घराची मार्कीग सुरू केली आहे लवकरच काम सुरू होईल रेती आता मिळेल एक आठवडयाच्या आत काम सुरू होईल.

मा.सभापती : काम सुरू करावे. तसा रिपोर्ट स्थायी समितीकडे सादर करावा.

श्री.कचरू सोनवणे : माझे वाडार्त रस्ते ड्रेनेज गटार होणार होती परंतु घर कुल योजनेच्या निधीतून ही कामे होणार असे श्री.सिकंदर अली यांनी पत्र दिले. घरकुलाच्या माध्यमातून ड्रेनेज गटारच्या कामासाठी ३ कोटीचा निधी आलेला आहे ही कामे १५ दिवसात सुरू करणार होते अदयाप सुरू का केले नाही.

उपअभियंता(स्लम) : एक एक गल्ली घेत आहे एका गल्लीत १५-२० घरे असून घरे झाल्यानंतर रस्ता नाली व गटारचे काम हाती घेणार आहे. सर्व एकाच वेळी चालू केले तर रस्ते खराब होतील.

श्री.कचरू सोनवणे : दोन वर्षात २५ घरे केली त्यांना दरवाजा खिडक्या नाहीत ३५१ घरे करायची आहे दोन वर्षात गटार रस्ते ड्रेनेजचे काम केले नाही ३५१ घरे करण्यास सात आठ वर्षलागल्यास रस्त्यावर खडडे करून ठेवणार काय याला सात-आठ वर्ष लागणार काय बाकीची रस्ते गटार नालीची कामे केंव्हा होतील.

उपअभियंता (स्लम) :तशी परीस्थिती होणार नाही.

श्री.कचरू सोनवणे :त्या वार्डात लोकांना रस्त्यावरून पायी चालता येत नाही.शासनाचा निधी येवून दोन वर्ष झाले खर्च होत नाही दोन वर्षात २५ घरे तर ३५१ घरे होण्यासाठी आठ महिणे लावणार काय तोपर्यत तेथील रस्त्याची परीस्थिती बिकट होणार महापालिकेचा निधी खर्च होणार नाही शासनाकडून आलेला निधी सुध्दा वेळेवर खर्च करणार नसेल तर योग्य नाही.

उपअभियंता(स्लम) :एक घर पाडून दुसरे करणे अशी स्कीम आहे. त्यामुळे वेळ लागतो हे काम करतांना बाजूच्या घराला सुध्दा धक्का लागू नये याची दखल घेतल जाते कारण ही सर्व मातीची घरे आहे. एक एक गल्लीतील घरे पूर्ण होणार तसतसे इतर विकास कामे तेथे सुरू होणार

मा.सभापती :स.सदस्य श्री. सोनवणे तसेच संबधीत अधिकारी व मी आपण एकत्रित शनिवारी सदर ठिकाणी पाहणी करू.

श्री.कचरू सोनवणे :जो ठेकेदार काम करतात त्यांचेवर अधिका-यांचा अंकूश नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :शासनाचा निधी आहे खर्च करावा. काम लवकर होत नसेल तर एक एक गल्लीचे काम एक एक ठेकेदाराकडे विभागून दयावे.

श्री.सिताराम सुरे :डीपी प्लॅन रस्ता किती दिवसात विकसीत करावयास पाहिजे.माझे वार्डात ३६ मीटर रूंद ३ कि.मी. लांबीचा रस्ता असून १९९१ च्या डिपी प्लॅनचा आहे शासनाने ही त्यास मान्यता दिली सन २००६ मध्ये या रस्ता विकसीत करण्यासाठी डिफर पेमेन्टवर काम करण्यासाठी दोन वेळेस निविदा काढलीपरंतु ते काम का झाले नाही कळायला मार्ग नाही. वेळोवेळी मी सभेत प्रश्न विचारला होता कार्यवाही केली नाही. मा.आयुक्तांना पत्र देवून विचारणा केली की, दोन वेळेस निविदा काढल्या, अद्याप काम का झाले नाही. तो पैसे कुठे वापरला.

श्री.रविकांत गवळी : १९९१ ला डीपी प्लॅन मंजूर झाला तेथे वसाहती विकसीत झाल्या जे कम्प्लेशन दिले ते ३६ मीटरं रस्त्याचा विचार करूनच दिल्या लिगल वसाहती झालेल्या असतांना नागरीकांना येण्याजाण्यासाठी रस्ता नाही.

अतिक्रमण काढले तर जबाबदारी कुणाची. हा रस्ता केंव्हा होणार खुलासा घ्यावा.

श्री.सिताराम सुरे : १९९१ ते २००० पर्यत २४ मीटरचा रस्ता होता २००१ च्या डिपी प्लॅननुसार तो ३६ मी. झाला १२मी. वाढीमध्ये १७ घरे अनधिकृत बाधीत होतात. या रस्त्याचा विकास का होत नाही. कोण राजकारण करते माहित नाही. कृषी उत्पनन बाजार समितीला पर्यायी रस्ता उपलब्ध होईल. जेथे रस्तेच नाही तेथे एक रूपया खर्च होत नाही परंतु शासनाचा आयआरडीपीच्या माध्यमातून जे चांगले रस्ते उखडून डब्ल्युबीएम व दोन लेअर दोन लेअरे बी.एम. सिलकोट मारला असता तर २५ कोटीतून १५ कोटी शिल्लक राहिले असते. तेथे रस्ते नाही तेथे प्राधान्य द्यावे. एन-९ मध्ये जेसीबीने डांबराचा लेअर काढला म्हणून हडको येथील पुल ढासळला १०-१५ लक्ष खर्च केले. जेथे गरज नाही तेथे काम होते. डीपी रस्त्यात जे घरे बाधीत होत असेल ते पाडावे २४ मीटर मध्ये काही शेतक-याच्या विहिरी घरे येत असेल तर मोबदला दयावा. भुसंपादन करावे २४ मीटर खुली जागा आहे त्या रस्त्याचे काम केले तरी चालेल. मोबदला द्यावा. शासनाचा निधी असेल किंवा महापालिकेच्या कराच्या माध्यमातून जमा झालेला असेल यांची उथळमाफ करू नये. व्यवस्थीत वापर व्हावा. याची जाणीव प्रशासनाने ठेवावी.

अति.शहर अभियंता :पुर्ण ३६ मीटर रस्त्याचे भुसंपादनाचे काम बाकी आहे जे एक्झ्युएशनचे जो पार्ट या विभागाच्या संबधीत आहे तो करता येत नाही.त्यांचे वार्डात आयआरडीपी मधील एक रस्त्याचे काम पुर्ण होत आलेले आहे

श्री.सिताराम सुरे :रस्ता ताब्यात नव्हता तर दोन वेळेस डिफर पेमेंन्टमधून काम करण्यासाठी निविदा कशा काढल्या होत्या.

अति.शहर अभियंता :निविदा काढली होती रद्य करण्यात आली १०० टक्के भुसपादाने काम होते एक दोन वर्षात झाले नसते म्हणून काम रद्द करण्यात आले. जेव्हा ही जागा महापालिका ताब्यात घेईल त्यावेळी तो रस्ता करण्यात येईल.

श्री.सिताराम सुरे :डीपी प्लॅन मध्ये येत असलेल्या जमिनी किती वर्ष आपल्या ताब्यात ठेवता येतात.

शहर अभियंता :डीपी प्लॅनचे रस्ते पहिल्यांदा विकसीत व्हायला पाहिजे.शहरात होणारी गर्दी कमी होईल.जसजसे निधी उपलब्ध होईल तसतसे भुसंपादन केले जाईल. आर्थिक अडचणींमुळे होत नाही.

श्री.सिताराम सुरे :या रस्त्याच्या भुसंपादनासाठी सन २००५-०६ प २००६-०७ या आर्थिक वर्षात ३ कोटी बजेट ठेवले होते का कार्यवाही केली नाही.

शहर अभियंता :डीपी प्लॅन रस्त्याची प्राधान्य क्रम ठरवा जे ५ कोटी ठेवले जाते त्यांचे पुढील वर्षापासून नियोजन करू.

श्री.सिताराम सुरे : हा रस्ता होणे गरजेचे आहे आपण स्वत: व्हिजीट द्यावी. कुणाचे अतिक्रमण होणार नाही ऑलरेडी १७ घराचे अतिक्रमण झालेले आहे. त्यामूळे हा रस्ता होत नाही.

मा.सभापती : या रस्त्याची शह अभियंता यांनी तात्काळ व्हिजीट करावी. स्थायी समितीकडे अहवाल द्यावा. आपण चर्चा करू.

श्री.कचरू मोरे :जो कुणी बोलत नाही त्यांचे वार्डात काम होत नाही. माझे वार्डातील अति महत्वाच्या रस्त्याचे काम होत नाही. या रस्त्याचे कामाची वर्क ऑर्डर झाली, काम का होत नाही. स्लम भागात काम करण्याची प्रशासनाची प्रवृत्ती ही नकारात्मक आहे. वेदांतनगर ते फुलेनगर चांगला रस्ता असतांना तोडला. डिफर्ड पेमेंटवर केले. माझे वॉर्डात ३ वर्क ऑर्डर झाल्या, कधी सुरू करणार.

अति.शहर अभियंता :स.सदस्य यांचे सोंबतच त्यांचे वार्डाची पाहणी केली दोन रस्त्याचे काम मंजूर झाली. काम सुरू होईल मुख्य रस्त्यावर डांबरीकरणाचे काम करण्यासाठी वर्कऑर्डर झालेली आहे. मागिल तीन -चार महिण्यापासून सर्वच ठेकेदाराची कामे बंद केली होती. आता एक एक काम सुरू केलेले आहे त्यांचे वार्डातील हेही काम करण्यात येईल.

श्री.कचरू मोरे : इतर वार्डात आजही कामे चालू आहे. जे स.सदस्य बोलत नाही त्यांचे वार्डात काम होत नाही.वेंदातनगर ते फुलेनगरचा चांगला रस्ता खोदून डिफर पेमेंन्टवर पुन्हा रस्त्याचे काम करून खर्च केला ते करण्याची गरज नव्हती.माझे वार्डातील तीन कामाचे वर्क ऑर्डर झालेल्या आहे सदर कामे केंव्हा सुरू करणार आहेत.गेल्या तीन वर्षात स्लम भागात एक ही काम झालेले नाही.

अति.शहर अभियंता : कोणत्या तीन कामाच्या वर्कऑर्डर झाल्या संचिका बघून कार्यवाही करण्यात येईल.केंव्हा काम सुरू होईल हे स.सदस्य यांना पत्राने कळविण्यात येईल.

मा.सभापती :उद्या सकाळी माझे दालनात सकाळी ११-३० वा. चर्चा करून ठरवू.

श्री.कटकटे सतीष :गजानन महाराज मंदीर चौक ते पुंडलिकनगरकडे जाणा-या रस्त्याचे चालू असलेले काम बंद झाले ते का सुरू होत नाही.

अति.शहर अभियंता :डिफर पेमेंन्टवर ते काम आहे. त्या गुत्तेदारास पेमेन्ट दिले गेले नव्हते. म्हणून काम बंद होते. पेमेन्ट देण्याची कार्यवाही आता होईल पुढील आठवडयापासून काम चालू होईल.

श्री.रविकांत गवळी : टेंडर होवून वर्क ऑर्डर देवून कामे होत नाही अशा अनेक सदस्यांच्या सदस्यांनी अनेकदा मत मांडले परंतु हे सर्व व्यवस्थीत होण्यासाठी जकात शिवाय पर्याय नाही.शासनाने आदेश केले की उपकराची कार्यवाही जोपर्यत व्यवस्थीत होत नाही तोपर्यत जकात चालू ठेवावी. आचारसंहिता लागल्यास पुर्वीच्याच रेटप्रमाणे त्याच एजन्सीला मुदतवाढ दिली जाईल यात जी नैसर्गीक वाढ होवून महापालिकेला उपत्न मिळाणार असेल ते मिळणार नाही त्यासाठी तात्काळ पुढील वर्षीचा ठेका म्हणजे दि.१.३.२००९ पासून देण्यासाठी लवकरात लवकर कार्यवाही सुरू करण्याचे प्रशासनाला आदेशीत करावे.

श्री.संजय जोशी : जकात जी एजन्सी वसूल करीत आहे त्यांचेशी महापालिकेने अधिकृत करारनामा केलेला आहे का?

जकात अधिक्षक :सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून १९ नोंव्हेंबर २००८ पासून १०२ दिवसासाठी पुर्वीच्या आहे त्याच सहकार एजन्सीकडून जकात वसुली करण्याचा ठेका दिलेला आहे. त्या एजन्सीला स्थायी समितची मान्यता आहे. २८ फेब्रुवारी २००९ मुदत संपणार त्यापुर्वी होईल.

श्री.संजय जोशी :१०२ दिवसानंतर आचारसंहिता लागल्यास त्याच एजन्सीला मुदतवाढ देणार काय नवीन टेंडर काढण्यासाठी पारदर्शकता असावी टेंडर प्रोसेस सुरू करावी.

जकात अधिक्षक :२८ फेब्रुवारी २००९ ला एजन्सीची वसुली करण्याची मुदत संपणार आहे.त्यापूर्वी टेंडर प्रोंसेस सुरू करणार आहोत.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : सर्वसाधारण सभेंची विषय पत्रिका खंडीत करण्यासाठी आम्ही शासनाकडे तसेच मा.आयुक्ताकडे अपील केले आहे. एजन्सी ठरविण्याचा अधिकार हा स्थायी समितीला आहे. दोन तीन महिण्यात आचारसंहीता लागण्याची शक्यता आहे. त्यासाठी अगोदर पुढील वर्षाचे जकात वसुलीचे टेंडर काढून प्रोसेस पुर्ण करण्याचे आदेशीत करावे.

मा.सभापती : जकात हे महापालिकेचे मोठे उत्पन्नाचे साधन आहे. म्हणून निविदाची प्रक्रिया त्वरीत सुरू करावी. सर्व प्रक्रिया पूर्ण करून जानेवारीच्या पहिल्या आठवडयात स्थायी समितीसमोर ठेवावे या बाबत लवकरात लवकर कार्यवाही करावी. महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यास मदत होईल.

**विषय क्र. १३७ :** (दि.१५.३.२००८ रोजी स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र.४४९- सदर प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्या संदर्भात बी.ओ.टी.कक्षप्रमुख यांचेकडील पत्र जा.क्र.मनपा/बीओटी/२००८/५१० दि.१८.११.२००८ अन्वये कळविल्यानुसार पुनः सादर.)

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहानुरवाडी येथील भाजी मार्केटची जागा बीओटी तत्वावर विकासकाकडून विकसीत करण्यात आली असून सदर ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविण्यात आले आहेत.

शहानुरवाडी येथील भाजी मार्केटची जागा तीन वर्षाच्या भाडेतत्वावर भाड्याने देणेसाठी निविदा काढण्यात आली असता, निविदा विक्रीच्या अंतीम दिनांकास एकूण दोन निविदा विक्री झाल्या तसेच दिनांक ११/१/२००८ रोजी ई-टेंडरींग द्वा रे निविदा उघडण्यात आल्या असता, एक निविदा भरून प्राप्त झाली.

प्राप्त झालेली निविदा मे.रागा कम्प्युटर सेंटर यांची असून त्यांची निविदा रूपये ५,९०,०४०/- एवढी रक्कम प्रति वर्ष भाडे दर भरून प्राप्त झाली. दर कमी असल्याने संबंधित निविदाधारक यांना वाटाघाटीसाठी बोलाविले असता, वाटाघाटी अंती निविदाधारक यांनी उपरोक्त दरामध्ये रूपये ५०,०००/- ची वाढ करून भाडेपट्ट्या करीता रूपये ६,४०,०००/- प्रति वर्ष एवढे दर मान्य केले आहेत.

शहानुरवाडी येथील भाजी मार्केटची जागा तीन वर्षाच्या भाडेतत्वावर देणेचा प्रस्ताव असुन निविदाधारक यांना खालील बाबींची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

१. महानगरपालिके सोबत तीन वर्षासाठी भाडेपट्टा करार करावा लागेल.
२. जवळपास १००० डिटॅचेबल प्रिफॅब्रीकेटेड कव्हर्ड गाळे तयार करणे आवश्यक राहील.
३. भाडेपट्ट्याची रक्कम ठरविल्याप्रमाणे दरवर्षी महानगरपालिकेस भाडेपट्ट्याचा भरणा करावा लागेल. ठराविक वेळेवर भाडे न भरल्यास २% प्रतिमहा प्रमाणे व्याज आकारण्यात येईल व ही रक्कम सुरक्षा ठेव रक्कमेतुन कपात करण्यात येईल.
४. प्रत्येक सोमवारी भाजी मार्केटसाठी गाळे भाड्याने द्यावे लागेल व इतर सहा दिवस अनुज्ञेय कामासाठी वापर करावा.
५. भाजी मार्केटसाठीच्या जागेची साफसफाई व देखरेख करणे एजन्सीला बंधनकारक राहील.

६. सर्व प्रकारचे टॅक्स, विज पुरवठा बिल, पाणी पुरवठा बील, मनपाचे कर इत्यादी निविदाधारकास भरणे बंधनकारक राहील.

७. आवश्यक ना हरकत प्रमाणपत्रे व परवानगी संबंधित खात्याकडून प्राप्त करणे निविदाधारकास बंधनकारक राहील.

८. महानगरपालिकेस देणार असलेले भाडे, गाळे तयार करण्यासाठी येणारा खर्च व इतर खर्च एजन्सी गाळे व जागा भाड्याने देवुन वसुल करू शकेल.

९. तीन वर्षानंतर एजन्सीला सदर जागा चांगल्या स्थितीत मनपास परत करावी लागेल.

करीता निविदाधारक मे.रागा कॅम्प्युटर सेंटर यांचे दर रूपये ६,४०,०००/- प्रति वर्ष प्रमाणे भाडे तीन वर्षासाठी निविदेतील अटी व शर्तीसह मान्य करणेसाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.संजय जोशी :यापूर्वी हा विषय आला होता चर्चा केली तो स्थगित केला पुन्हा प्रशासनाने आता सादर केला. यापूर्वी फक्त सोमवार या दिवशीचा ठेका संबधीत गुत्तेदारास देत होतो.दर सोमवारचे १२ हजार वर्षात ५२ सोमवार येतात असे वर्षात ६ लक्ष वसूल होत असे. आता सात दिवसासाठीचा ठेका द्यायचा वर्षाला त्यापोटी ६.४० लक्ष रक्कम संबधीत गुत्तेदार देणार. ही निविदा रद्द करावी, सोमवारचा नियमीत बाजार तेथे भरवावा. सकाळी ५.०० वा. त्या भागात वाकींग करण्यासाठी ४-५ हजार नागरीक असतात. त्यांना बीड बायपास इतर लहान मोठया रस्त्याने फिरावे लागते. अनेकांचे अपघात झालेले आहे १.२५ लक्ष क्वे.फुट जागा गुत्तेदारास न देता एक दिवस आवश्यक म्हणून सोमवारचा तेथे बाजार भरवावा पेव्हरब्लॉक बसविलेले आमदार निधीतून जॉगिंग ट्रॅक करून त्या भागातील नागरीकांना तेथे फिरण्याची व्यवस्था करावी. तसेच सुलभ शौच्छालय मंजूर झालेले आहे ते करण्यात यावे. सकाळी रक्तदाब, मधुमेह चे लोक फिरतात. जॉगींग ट्रॅक असावे. असे टेंडर आणू नये.

श्री.सतीष कटकटे :मा.आमदार श्री.किशनचंद तणवानी यांचे निधीतून जॉगिंग ट्रॅक करता येईल. तशी या समितीने त्यांचेकडे निधीची मागणी करावी.

मा.सभापती : मा.आमदार श्री. दर्डा साहेब यांचेकडून १० लक्षचा निधी घेवू कमी पडल्यास आमदार श्री.तणवानी यांचेकडून मागणी करता येईल.

श्री.कचरू मोरे : आमच्या वार्डात सुलभ शौचालयाची अवस्था बिकट आहे. त्यास दरवाजे खिडक्या नाही. विचारणा केली असता आज उदया कार्यवाही होईल असे आश्वासन अधिकारी देतात तसेच वैयक्तीक शौच्छालयासाठी जे स्लम भागात योजना आहे त्यासाठी ६५० रू. भरावे व ते घ्यावे`अशी स्कीम आहे ती योजना एक वर्षापासून थांबलेली आहे सविस्तर माहिती घ्यावी.

मा.सभापती :संबधीत अधिकारी सभागृहात उपस्थित नाही परवानगी घेवून गेलेले आहे त्यांनी पुढील बैठकीत या संबधी खुलासा सादर करावा.

उपअभियंता(स्लम) :सदर काम बीओटी तत्त्वावर घेण्यात आलेले आहे. त्यात १.२५ लक्ष क्वे.फुट जागा बांधून त्यावर पेव्हरब्लॉक करून देत आहे. यावर विकली मार्केट प्रस्तावित करण्यात आलेले आहे बाकी चार -पाच दिवस जे अनुज्ञेय मार्केट असेल ते करू शकतो असे रितसर टेंडर कॉल करण्यात

आले आहे.विकासकाने ५.९० लक्षचे टेंडर दिलेले होते. वाटाघाटीनंतर ५० हजारची वाढ झाली.

मा.सभापती :दर सोमवारचा ठेका दिला त्यापोटी वर्षाला ६ लक्ष मिळत होते. आता ६.४० मिळतात असे असतांना तेथे बीओटीवर देण्याची गरज का पडते.

उपअभियंता(स्लम) :नळ, लाईट, ड्रेनेज इत्यादी ही सर्व करण्याची जबाबदारी ही विकासकावर असणार आहे.

श्री.रविकांत गवळी : ५२ दिवसाचे ६ लक्ष येत होते. आता ६.४० सर्व विकसीत केल्यानंतर ३६५ दिवसाचे मिळतात हा फरक समजलेला नाही याचा खुलसा करावा.

उपअभियंता (स्लम) : यात युरोपियन मार्केट तयार करीत असून १०००गाळे तयार होणार आहे. त्यात विकासक हे ३८ लक्षची गुंतवणूक करीत आहे.सोमवार दिवस सोडून इतर दिवशी जे अनुज्ञेय मार्केट चालणार आहे त्यातून त्यास पैसे मिळणार ते फिजीबल करून हे दर दिलेले आहे.

श्री.संजय जोशी :या जागेवर ५'x१०' दुकान करायचे असेल तर ब्लॉक मध्ये पाईप टाकावे असा विषय चर्चेत आलेला होता. तत्कालीन आयुक्त यांना ही योजना मान्यच नव्हती.त्यांना भारतीय नको युरोपीयन मार्केट पाहिजे होते. चार पाईप ठेवले असते तर ब्लॉक काढण्याची गरज पडली नसती. तो मागचा विषय सोडून द्यावा. फक्त सोमवारचा बाजार भरवावा. इतर दिवशी लोकांना फिरण्यासाठी ठेवण्यात यावा.

मा. सभापती : शहानुरवाडी येथील भाजी मार्केटची जागा तीन वर्षाच्या भाडेतत्वावर भाड्याने देणे संबंधीचा प्रस्ताव आहे. यापुर्वी दर सोमवारी भरणाऱ्या बाजाराचे प्रति बाजार १२ हजार रूपये महापालिकेला मिळत होते. याप्रमाणे वर्षाचे ६.०० लाख रूपये फक्त सोमवारच्या आठवडी बाजारापासून मिळत होते.

या प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सदर एजन्सी फक्त ६.०० लाख रूपये देणार आहे. त्या बदल्यात आठवड्याचे सातही दिवस या जागेचा वापर होणार आहे. यामध्ये महापालिकेचा कुठल्याही प्रकारचा फायदा होणार नाही. स.सदस्यांनी तशा भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्यामुळे सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात येत आहे. फक्त सोमवार आठवडी बाजारचा ठेका देण्याकरीता आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

तसेच स.सदस्यांचे सूचनेप्रमाणे या भागात नागरीकांना सकाळी फिरण्यासाठी जागा नसल्यामुळे त्या ठिकाणी कायमस्वरूपी जॉगींग ट्रॅक म्हणुन वापर करण्यास मान्यता दिली जाते. जॉगींग ट्रॅकसाठी लागणारा निधी मा.आमदार राजेंद्र बाबुजी दर्डा यांचेकडून मिळविण्यात येईल. मा.आमदारांचे निधीतून सदरील काम पूर्ण करण्यात येईल.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता व प्रभागाचे स.नगरसेवक यांचे सूचनेनुसार सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात येतो. या भागात

नागरीकांना सकाळी फिरण्यासाठी जागा नसल्यामुळे त्या ठिकाणी कायमस्वरूपी जॉगींग ट्रॅक म्हणुन वापर करण्यास मान्यता दिली जाते. आठवड्याच्या प्रत्येक सोमवारी भरणाऱ्या आठवडी बाजाराचा ठेका देण्यासाठी प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३८ :**

उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, मोहल्ला सिल्कमील कॉलनी येथील स्थानिक रहिवाशी श्रीमती बिल्कीस बेगम हबीब तांबोळी घर क्र.५-२८-११६/पी यांच्या खाजगी मिळकतीतील पहिल्या मजल्यावरील खोल्याचे क्षेत्रफळ १५९.८५ चौ.मी. ची जागा महानगरपालिका उर्दू प्राथमिक शाळेसाठी रक्कम रू.२२/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे मा.स्थायी समिती सभा दि.३०.३.२००७ विषय क्र.३४९ नुसार मान्यता प्राप्त झाली होती. परंतु संबंधीत इमारत मालकाने सदरील भाडे कमी असल्याबाबत व सदरील इमारतीचा मालमत्ता कर, पाणीपट्टी, विद्युत देयक व इतर कर हे महानगरपालिकेस भरणा करावे लागेल असे, दि.२५.६.२००७ रोजी निवेदन दिले आहे.

त्यानुसार तत्कालीन मा.आयुक्त महोदय यांचे दालनात झालेल्या चर्चेनुसार सदरील इमारतीचे भाडे हे सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांचेकडून निश्चित करून घेणेसाठी सुचविण्यात आले असता या कार्यालयाने १५९.८५ चौ.मी. या जागेसाठी प्रती माह रू.९३२८/- आकारणे योग्य असल्याबाबत कळविले आहे.

तसेच सदरील इमारतीचा मालमत्ता कर, पाणीपट्टी, विद्युत देयक व इतर कर हे महानगरपालिकेस भरावे लागेल या अटीवर मो.सिल्कमील कॉलनी, घर क्र.५.२८.११६/पी श्रीमती बिल्कीस बेगम हबीब तांबोळी यांच्या इमारतीमधील पहिला मजला महानगरपालिका उर्दू प्राथमिक शाळेसाठी भाड्याने घेणे योग्य.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला सिल्कमील कॉलनी येथील स्थानिक रहिवाशी श्रीमती बिल्कीस बेगम हबीब तांबोळी घर क्र.५-२८-११६/पी यांच्या खाजगी मिळकतीतील पहिल्या मजल्यावरील खोल्याचे क्षेत्रफळ १५९.८५ चौ.मी. या इमारतीमधील पहिला मजला महानगरपालिका उर्दू प्राथमिक शाळेसाठी भाड्याने घेतलेल्या जागेचे १५९.८५ चौ.मी. या जागेसाठी रू.९३२८/- प्रती माह प्रमाणे संबंधीतास भाडे देण्यास मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३९ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मंजुरीनुसार उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की,

**०१. मौजे भारतनगर नंबर-१** : येथील खाजगी व्यक्ती श्री.बाबासाहेब बाबुराव झगरे यांच्याकडून महानगरपालिकेने शाळेकरीता इमारतीचे क्षेत्रफळ ४७.९२ चौ.मी. भाडेतत्वावर घेण्यासाठी सिध्द शिघ्र गणक सन २००७-२००८ नुसार भाडे रक्कम रू.५५/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे संबंधीतास देणे योग्य राहील.

**०२. मौजे भारतनगर नंबर-२** : येथील खाजगी व्यक्ती श्री.संतोष दगडू वाघमारे यांच्याकडून महानगरपालिकेने शाळेकरीता इमारतीचे क्षेत्रफळ ३६.९६ चौ.मी. भाडेतत्वावर घेण्यासाठी सिध्द शिघ्र गणक सन २००७-२००८ नुसार भाडे रक्कम रू.४३/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे संबंधीतास देणे योग्य राहील.

**०३. मौजे किराडपुरा** येथील खाजगी व्यक्ती श्री.सय्यद मझरूल हक यांच्याकडून महानगरपालिकेने शाळेकरीता इमारत ज्याचे चटई क्षेत्रफळ १५०.८९ चौ.मी. भाडेतत्वावर घेण्यासाठी इमारत व उद्यान बांधकाम विभागाकडून सिध्द शिघ्र गणक सन २००८ नुसार भाडे **रक्कम रू.४२६८/-** प्रती माह प्रमाणे संबंधीतास देणे योग्य राहील.

तसेच मालमत्ता कर व पाणीपट्टी कराचा भरणा भाडेधारकास करावा लागेल.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे **०१.मौजे भारतनगर नंबर-१** : येथील खाजगी व्यक्ती श्री.बाबासाहेब बाबुराव झगरे यांच्याकडून महानगरपालिकेने शाळेकरीता (इमारतीचे क्षेत्रफळ ४७.९२ चौ.मी.) भाडेतत्वावर घेतलल्या इमारतीचे रक्कम रू.५५/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे संबंधीतास भाडे देण्यास मंजुरी देण्यात येते.

**०२.मौजे भारतनगर नंबर-२** : येथील खाजगी व्यक्ती श्री.संतोष दगडू वाघमारे यांच्याकडून महानगरपालिकेने शाळेकरीता (इमारतीचे क्षेत्रफळ ३६.९६ चौ.मी.) भाडेतत्वावर घेतलेल्या इमारतीचे रक्कम रू.४३/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे संबंधीतास भाडे देण्यास मंजुरी देण्यात येते.

**०३.मौजे किराडपुरा** येथील खाजगी व्यक्ती श्री.सय्यद मझरूल हक यांच्याकडून महानगरपालिकेने शाळेकरीता (चटई क्षेत्रफळ १५०.८९ चौ.मी.) भाडेतत्वावर घेतलेल्या जागेचे **रक्कम रू.४२६८/-** प्रती माह प्रमाणे संबंधीतास भाडे देण्यास मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४० :**

कार्यकारी अभियंता (जलनि:सारण, विद्युत, इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दिल्लीगेट ते हडको कॉर्नर पर्यंत विद्युत पोल लाऊन पथदिवे कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. हडको कॉर्नर ते जळगांव टी पॉइंट ते हर्सूल गांव रस्त्यावर पोल लावण्यात आलेले नाही. जळगांव टी पॉइंट हे शहराचे प्रवेशद्वार असून, या चौकात नेहमी वर्दळ असते. तसेच अजिंठा लेणी व जळगांवकडे जाणारा हा हायवे रस्ता असल्याने हडको कॉर्नर ते जळगांव टी पॉईंट ते हर्सूल गांव रस्त्यावर पोलसह उर्जा बचत दिवे लावण्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.१४,५८,४३५/- चे तयार करण्यात आले असून, सदर कामाचा खर्च सन २००८-०९ च्या स्पील ओव्हर रक्कमे मधुन भागविण्यात येईल.

तरी हडको कॉर्नर ते जळगांव टी पॉइंट ते हर्सूल गांव रस्त्यावर पोलसह उर्जा बचत दिवे लावण्याचे अंदाजपत्रक रक्कम रूपये १४,५८,४३५/- चा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : मंजूर करण्यास हरकत नाही. तीन वर्षापासून हर्सुल टी पॉईन्ट रस्त्यावर विद्युत दिवे बसविण्यासाठी वारवांर तक्रार केली. यापूर्वी दिल्लीगेट ते हिमायतबाग त्यानंतर हिमायतबाग ते हर्सुल पर्यत टेंडर दिले काम पण झाले. निधी संपला. पुन्हा टेंडर काढले गुत्तेदार काम घेण्यात तयार नव्हते. हडको कॉर्नर ते हर्सूल पर्यत काम बाकी आहे. तीन कि.मी. कामासाठी चार वेळेस निविदा काढाव्या लागल्या. प्रत्येक गुत्तेदाराचे मागिल चार-पाच कामाचे बील थकलेले असल्यामूळे ठेकेदार नवीन काम घेण्यास तयार नाहीत. सी. पी. ऑफिस, ट्रॉफिक पोलीस, सेन्ट्रल जेल, बी. ॲण्ड सी. या सर्व विभागाचे विद्युत दिवे लावण्या

बाबत पत्र महापालिकेला आलेले आहे. व जळगांव टी पॉइंट हे शहराचे प्रवेशद्वार असून, या चौकात नेहमी वर्दळ असते. तसेच अजिंठा लेणी व जळगांवकडे जाणारा हा हायवे रस्ता असल्याने हडको कॉर्नर ते जळगांव टी पॉईंट ते हर्सूल गांव रस्त्यावर पोलसह उर्जा बचत दिवे लावण्याचे काम तातडीने करून घेण्यासाठी आपल्या अधिकारात यास त्वरीत मंजूरी द्यावी. स्थानिक उपलब्ध गुत्तेदारा मार्फत किंवा ५ (२) (२) अंतर्गत हे काम तातडीने करून घेण्यात यावे. तसेच शहानुरमिया दर्गा जवळही चार रस्ते जातात तेथे अंधार असतो. हायमास्टचे टेंडर निघालेले आहे त्यास ही मंजूरी द्यावी.

मा.सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. स.सदस्य श्री. रविकांत गवळी यांनी सुचवल्या प्रमाणे हडको कॉर्नर ते हर्सुल पर्यत रस्त्यावर पोलसह उर्जा बचत दिवे लावण्याचे काम स्थानिक उपलब्ध गुत्तेदारामार्फत किंवा ५ (२) (२) अंतर्गत हे काम तातडीने करून घेण्यात यावे. तसेच शहानुरमिर्या दर्गा चौक मध्ये हायमास्ट लावण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हडको कॉर्नर ते जळगांव टी पॉईंट ते हर्सूल गांव रस्त्यावर पोलसह उर्जा बचत दिवे लावण्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.१४,५८,४३५/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. तसेच स.सदस्यांनी सुचविल्यानुसार सदर काम तातडीने करणे आवश्यक असल्याने मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ नियम (२) (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत त्वरीत काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४१ :**

उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद शहरातील महत्वाचे चौकात नागरीक वाहतुक नियमा बाबत जनजागृती करणेसाठी **इंडिया ॲड चंद्रपुर** यांच्या वतीने ४ चौ. फुट या आकाराचे २५० साईन बोर्ड लावण्याबाबत श्री. एस.महेमुद पिता एस. जलाल यांनी तीन वर्षाकरीता परवानगीची मागणी केलेली आहे. त्यासाठी संबंधीतांनी पोलीस कार्यालयाचे ना हरकत बाबतचे पत्र सादर केलेले असून पोलीस निरीक्षक, वाहतुक शाखा, औरंगाबाद शहर यांनी सुध्दा संमती दर्शविलेली आहे.

तरी परवानगी देय झाल्यास ४ चौ. फुट प्रमाणे २५० साईन बोर्डच्या नगास जाहीरात कराच्या रक्कमेपोटी रू.१,८०,०००/- ची भर मनपा फंडात पडणार असल्याने यास मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यास संबंधीताकडून एक वर्षाचे आगाऊ भरणा करून, करारनामा करून घेणे योग्य.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील महत्वाचे चौकात नागरीक वाहतुक नियमा बाबत जनजागृती करणेसाठी **इंडिया ॲड चंद्रपुर** यांच्या वतीने श्री.एस.महेमुद पिता एस.जलाल यांना, ४ चौ.फुट या आकाराचे २५० साईन बोर्ड लावण्यासाठी तीन वर्षाकरीता ४ चौ. फुट प्रमाणे २५० नग साईन बोर्ड लावण्यास परवानगी देण्यात येते. जाहीरात कराच्या रक्कमेपोटी रू.१,८०,०००/- ची भर मनपा फंडात पडणार असल्याने यास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनंतर संबंधीताकडून एक वर्षाचे आगाऊ भरणा करून घेऊन, करारनामा

करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.२ मयुरपार्क येथील ऑडीटर सोसायटी अंतर्गत १२ मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.८,९८,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे. एकुण ३ निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी ३ निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | २७% जास्त दराने |
| २. | एम. ए. सिद्यीकी | ३१.८६% जास्त दराने |
| ३. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ४५.४५% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रका पैकी ए. एस. कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७% ने जास्त आहेत. डांबर खरेदीचे बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेऊन वाटाघाटी अंती १९% जास्त दराने काम करण्यास संबंधीत एजन्सीने संमती दर्शविली आहे. ज्यामुळे सदर कामावर अंदाजपत्रकीय रक्कम रू.८,९७,९८६/- पेक्षा जास्त म्हणजेच रक्कम रू.१०,६८,६०१/- खर्च होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी ए. एस. कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९% जास्त दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.२ मयुरपार्क येथील ऑडीटर सोसायटी अंतर्गत १२ मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयाच्या इमारतीची देखभाल दुरूस्ती करण्याचे रक्कम रू.४,९९,३६१/- चे अंदाजपत्रक सा.बां. विभागाच्या सन २००४-०५ च्या जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यात येवुन रितसर फेरनिविदेनुसार प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा, म्हणजेच काझी मुबारीजउद्यीन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.११% कमी दराच्या निविदेच्या दरास मा.आयुक्त महोदय यांनी दिलेल्या मंजुरीनुसार इमारतीच्या देखभाल दुरूस्तीचे काम सुरू करण्यात आले असता इमारतीच्या छताची तांत्रिक पध्दतीने वॉटरप्रुफींग करणे, रंगकाम करणेचे अतिरिक्त काम करणे आवश्यक असल्याने त्यासाठी अर्थसंकल्प सन २००८-०९ मधील पान क्र. W-३४ अ.क्र.१ व २ नुसार उपलब्ध तरतुदीतुन वरील अतिरिक्त कामासाठीचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रूपये ७.५० लक्षचे तयार करण्यात आलेले असून त्यास दि.८.१०.२००८ अन्वये मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

करीता वरील विषयांकीत कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रूपये ७.५० लक्ष मान्यतेस्तव सादर. त्याचप्रमाणे या ठिकाणी आवश्यकतेनुसार करावे लागणाऱ्या विशिष्ट

प्रकारच्या अतिरिक्त बाबी अंदाजपत्रकीय दराने या कामाचे मुळ ठेकेदार काझी मुबारीजुद्दीन यांच्याकडून करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयाच्या इमारतीची देखभाल दुरूस्तीचे कामांतर्गत, इमारतीच्या छताची तांत्रिक पध्दतीने वॉटरप्रुफींग करणे, रंगकाम करणेचे अतिरिक्त काम करणे आवश्यक असल्याने त्यासाठी तयार केलेल्या रक्कम रूपये ७.५० लक्षच्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच वाढीव कामातील (मुळ अं.प.रक्कम रू.४,९९,३६१/- वजा जाता), आवश्यकतेनुसार करावे लागणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या अतिरिक्त बाबी अंदाजपत्रकीय दराने या कामाचे मुळ ठेकेदार काझी मुबारीजुद्दीन यांचेकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्र. १४४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, **प्रभाग-अ** मधील मुख्य रस्त्यांचे डांबरी पॅचवर्कद्वारे दुरूस्ती करण्याचे कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन २००७-२००८ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.१९,४४,५६५/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पातील रस्ते दुरूस्ती-पॅचवर्क या लेखाशिर्षातून करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झालेली असून मा.आयुक्त यांनी सदर प्रस्तावास मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेबाबत आदेशीत केलेले आहे.

तरी सदर कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रू.१९,४४,५६५/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे **प्रभाग-अ** मधील मुख्य रस्त्यांचे डांबरी पॅचवर्कद्वारे दुरूस्ती करण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,४४,५६५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, **प्रभाग-ब** मधील मुख्य रस्त्यांचे डांबरी पॅचवर्कद्वारे दुरूस्ती करण्याचे कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन २००७-२००८ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.१९,८०,१९४/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पातील रस्ते दुरूस्ती-पॅचवर्क या लेखाशिर्षातून करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झालेली असून मा.आयुक्त यांनी सदर प्रस्तावास मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेबाबत आदेशीत केलेले आहे.

तरी सदर कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रू.१९,८०,१९४/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे **प्रभाग-ब** मधील मुख्य रस्त्यांचे डांबरी पॅचवर्कद्वारे दुरूस्ती करण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,८०,१९४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १४६ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा मुख्य प्रशासकीय इमारत टप्पा क्र.१, २ व ३ येथे सर्व मा.पदाधिकारी, अधिकारी यांचे दालन, कर्मचारी कक्ष येथे पार्टीशन, रंगकाम, विविध प्रकारची गळती दुरूस्ती इत्यादी प्रकारचे अत्यावश्यक कामे करणे आवश्यक असल्याने याबाबत वेळोवेळी मा.पदाधिकारी, अधिकारी यांचेकडून सूचना प्राप्त होत असतात व सदरील कामे सुचना मिळताच तातडीने करणे आवश्यक असल्याने त्यास्तव आर्थिक वर्ष सन २००८-०९ अंतर्गत आवश्यकतेनुसार विविध कामे करण्याच्या दृष्टीने सा.बां. विभागाच्या सन २००७-०८ च्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रू.१५.०० लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी स्थायी समिती सभेसमोर सादर करण्याबाबत शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन २००८-०९ या आर्थिक वर्षा अंतर्गत प्रशासकीय इमारती या लेखाशिर्षा अंतर्गत पान क्र.डब्ल्यु-४९ अ.क्र.११ अन्वये करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.१५.०० लक्ष चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा मुख्य प्रशासकीय इमारत टप्पा क्र.१, २ व ३ येथे सर्व मा.पदाधिकारी, अधिकारी यांचे दालन, कर्मचारी कक्ष येथे पार्टीशन, रंगकाम, विविध प्रकारची गळती दुरूस्ती इत्यादी प्रकारचे अत्यावश्यक कामे करणे यासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १४७ :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र.८८ अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे खडीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन २००५-२००६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.१९,२६,०००/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांची प्रशासकीय मान्यता झाली असून या कामाचा खर्च नविन खडी रस्ते (शहरी भाग) या लेखाशिर्षा खाली पृष्ठ क्र.१८२ अनुक्रमांक ०२ वर उपलब्ध तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

सदरील काम प्रभाग क्र.८८ अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे खडीकरण करणे या कामाचा समावेश आहे. करीता अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.८८ अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे खडीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,२६,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १४८ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सुरक्षा रक्षकांना सध्या २७५०-७०-३८००-७५-४४०० ही वेतनश्रेणी देण्यात येत आहे. संबंधीतांनी पोलीस शिपायांच्या प्रमाणे समकक्ष वेतनश्रेणी देण्याबाबत विनंती केली. आस्थापनेवर सद्यःस्थितीत ३७ सुरक्षा रक्षक कार्यरत आहेत. त्यापैकी माजी सैनिकातील

२६ सुरक्षा रक्षक वाढीव वेतनश्रेणीसाठी पात्र आहेत. पोलीस शिपायाची ५ व्या वेतन आयोगानुसार रू.३०५०-७५-३९५०-८०-४५९० वेतनश्रेणी असून सदर वेतनश्रेणी महानगरपालिकेतील सुरक्षा रक्षकांना लागू करण्यास मान्यता झाल्यास रू.८१,१६८/- इतके वार्षिक वाढ होत आहे. या वेतनश्रेणीचा लाभ माजी सैनिक म्हणून जे सुरक्षा रक्षक कार्यरत आहेत त्यांनाच देय आहे. ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील सुरक्षा रक्षकांना रू.३०५०-४५९० वेतनश्रेणी लागू आहे.

करीता सदर सुरक्षा रक्षकांना रू.३०५०-७५-३९५०-८०-४५९० ही वेतनश्रेणी लागू करणेबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.रविकांत गवळी : सुरक्षा रक्षकाचे काम जबाबदारीचे आहे. प्रस्तावात माजी सैनिकातील सुरक्षा रक्षकांची संख्या टंकलेखनाच्या चुकीमुळे २६ दर्शविलेली आहे. वास्तविक ही संख्या ३१ इतकी आहे. तशी दुरूस्ती करून घ्यावी. नियमानुसार पात्र असलेल्या सुरक्षा रक्षकांना सुधारीत वेतनश्रेणी लागू करावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : यांचे बरोबर जेवढे "सुरक्षा रक्षक" पदावर काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेणी देण्यात यावी. शासनाचे सेवा भरती नियमात सुरक्षा रक्षकांना तृतीय श्रेणीमध्ये समाविष्ट केल्यास महापालिकेतील सुरक्षा रक्षकांचा देखील त्यात समावेश करावा.

श्री.रविकांत गवळी : याच विषयाच्या अनुषंगाने असे की १९९० पासून अनेक कर्मचा-यांचे प्रकरण प्रलंबीत आहे त्यांना घरी बसून ५०-७५ टक्के पगार दिला जातो ही रक्कम लाखोच्या घरात आहे.न्यायालयाचा जो काही निकाल लागेल त्यानुसार कार्यवाही करता येईल परंतू हे कर्मचारी गेल्या १०-१५ वर्षापासून पेमेंन्ट घेतात याचा महापालिकेला फायदा नाही.या बाबतीतही विचार करण्यात यावा.

श्री.सतीष कटकटे : निलंबीत कर्मचारी किती आहे त्यांची यादी देण्यात यावी.

मा. सभापती : निलंबीत कर्मचाऱ्यांची यादी सदस्यांना देण्यात यावी. प्रस्तावात माजी सैनिकांतील सुरक्षा रक्षकांची संख्या २६ ऐवजी ३१ अशी दुरूस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते. सुरक्षा रक्षक पदावर काम करणाऱ्या सर्वांना ३०५०-४५९० ही वेतनश्रेणी देण्यास मंजुरी देण्यात येते. शासनाचे सेवा भरती नियमात सुरक्षा रक्षकांना तृतीय श्रेणीमध्ये समाविष्ट केल्यास महापालिकेतील सुरक्षा रक्षकांचा त्यात समावेश करावा.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनावरील माजी सैनिकातील पात्र सर्व सुरक्षा रक्षकांना वेतनश्रेणी रू. २७५०-४४०० ऐवजी रू.**३०५०-७५-३९५०-८०-४५९०** ही वेतनश्रेणी ठराव मंजुर झाल्याचे तारखेपासून लागू करण्यास व प्रस्तावात नमूद २६ ऐवजी ३१ सुरक्षा रक्षकांसह सर्व सुरक्षा रक्षकांना सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्याच्या दुरूस्तीसह सदर प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.२४ एम.आय.डी.सी.चिकलठाणा अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण व रूंदीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.२४,९८,८३७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामाचे निविदापत्रके मागविले असता एकुण ३ निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी ३ निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| १. | राजेंद्रसिंग अजितसिंग | ४.५% जास्त दराने |
| २. | चंद्रम्मा आशन्ना | १५% जास्त दराने |
| ३. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | २६.८९% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी राजेंद्रसिंग अजितसिंग यांचे दर सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५% जास्त आहेत. त्यामुळे कामावर रू.२६,११,२८५/- एवढा खर्च होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी राजेंद्रसिंग अजितसिंग यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५% जास्त दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. २४ एम.आय.डी.सी. चिकलठाणा अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण व रूंदीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक राजेंद्रसिंग अजितसिंग यांचेकडून सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५% जास्त दराने करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.९४ शाहूनगर भागात रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरीता अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन २००५-०६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून रक्कम रू.२२,९०,५००/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.६९ दि.३१.१.२००८ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (५) निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (५) निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा अहवाल ई-टेंडरींग विभागाकडून प्राप्त झालेला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.अरोरा कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा २४.१२% जास्त दराने |
| २. | एम. ए. सिद्यीकी | अं.प.दरापेक्षा २४.६७% जास्त दराने |
| ३. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा २८% जास्त दराने |
| ४. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ३०.१% जास्त दराने |
| ५. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ३५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.१२% जास्त दराची निविदा मे.अरोरा कन्स्ट्रक्शन कं. यांची आहे. दरासंबंधाने वाटाघाटी करून

अं.प.दरापेक्षा १९% जास्त दराने काम करण्यास संबंधीताने तयारी दर्शविलेली आहे. स.सदस्यांनी सद्य:स्थिती संबंधाने पत्र देऊन सदर काम पहिल्या टप्प्यात रक्कम रू.१०.०० लाखाच्या मर्यादेत करण्याबाबत पत्र दिले असून त्या कार्यवाहीसह अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९% जास्त दराने च्या निविदा दरास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी मे. अरोरा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९४ शाहूनगर भागात रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांचेमार्फत अं.प.दरापेक्षा १९% जास्त दराने करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच पहिल्या टप्प्यात रक्कम रू.१०.०० लाखाच्या मर्यादेत काम करण्यास व निधी उपलब्धतेनुसार उर्वरीत काम करण्यास मंजुरी देण्यात येते.. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५१ :**

अतिरिक्त शहर अभियंता, मनपा औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नागरी घनकचरा वाहतुकीच्या कामासाठी चार नग ८ ते १० घनमीटर क्षमतेचे मेडियम साईज कॉम्पॅक्टर्स आणि ६५० लिटर व ११०० लिटर क्षमतेचे अनुक्रमे १६० नग व ८० नग जी.आय. बिन्स खरेदी करावयाचे आहेत. बाराव्या वित्त आयोगातुन प्राप्त निधीमधुन खरेदी करण्यात येणार आहे.

या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रूपये १५८.२० लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर वर्तमानपत्रा मधुन व ई-टेंडरींग द्वारे निविदा सूचना क्र.एसीई/एमईसीएच/१५२/०८ दिनांक १७.७.२००८ अन्वये जाहीर निविदा मागविण्यात आल्या आहेत.

महानगरपालिकेने पुरवठा केलेल्या चार नग टाटा १६१३ चेसीस वर मेडियम साईज कॉम्पॅक्टर्सची उभारणी करणे आणि ६५० लि. व ११०० लि. क्षमतेचे अनुक्रमे १६० नग व ८० नग जी.आय. बिन्सचा पुरवठा करणे या कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदा सूचने नुसार एकुण ५ निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

निविदा धारकांनी नोंदविलेले दर पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | दर्शविलेले दर | कमी/जास्त% |
|---|---|---|---|
| १. | मे. कैलास वाहन उद्योग लि. पुणे | १,५१,८७,२००/- | ४% कमी |
| २. | मे. न्यु साई फायबर्स, मिरज | १,३७,६३,४००/- | १३% कमी |
| ३. | मे.ॲन्टोनी मोटार्स प्रा.लि. मुंबई | १,३६,८४,३००/- | १३.५% कमी |
| ४. | मे.टी.पी.एस.इन्फ्रास्ट्रक्चर लि.दिल्ली | १,०४,३६,४५४/- | ३४.०३% कमी |
| ५. | मे.कॅम ॲव्हीदा एन्व्हायरो इंजि. प्रा.लि., पुणे. | ९८,३२,१३०/- | ३७.८५% कमी |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ५ निविदांपैकी मे.कॅम ॲव्हीदा एन्व्हायरो इंजिनियर्स प्रा.लि. पुणे यांची निविदा सर्वात कमी दराची (३७.८५% कमी) असुन, ती रूपये ९८,३२,१३०/- रक्कमेची आहे.

करीता मे.कॅम ॲव्हीदा इंजिनियर्स प्रा.लि. पुणे यांची तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची व रूपये ९८,३२,१३०/- रक्कमेची निविदा मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागरी घनकचरा वाहतुकीच्या कामासाठी चार नग ८ ते १० घनमीटर क्षमतेचे मेडियम साईज कॉम्पॅक्टर्स आणि ६५० लिटर व ११०० लिटर क्षमतेचे अनुक्रमे १६० नग व ८० नग जी.आय. बिन्स खरेदी करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची मे.कॅम ॲव्हीदा इंजिनियर्स प्रा.लि., पुणे यांची सर्वात कमी दराची (३७.८५% कमी) म्हणजेच रूपये ९८,३२,१३०/- रक्कमेची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स.नं.१९४/१ मयुरपार्क, जाधववाडी या मंजूर रेखांकनातील खुली जागा "दर्शन हेल्थ क्लब" या संस्थेला भाडेतत्वावर देण्यास ले-आऊटमधील १५ भुखंड धारकांपैकी १२ रहिवश्यांचा आक्षेप असुन त्यांनी यापुर्वी देखील जागा देण्यासंबंधी कुणासही ना हरकत दर्शविलेली नाही.

असे असतांना या रेखांकनातील खुली जागा दर्शन हेल्थ क्लब या संस्थेस ३० वर्षाकरीता भाडेतत्वावर देण्यासंबंधी दि.३१/३/२००८ रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये ऐनवेळी प्रस्ताव ठेवण्यात आला व कुठलीही चर्चा न होता ठराव क्र.४९५ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. यास रेखांकनातील नागरीकांचा तीव्र आक्षेप असून सदरील ठराव रद्द करून सदरची जागा तेथील रहिवाश्यांच्या मुलांना खेळण्यासाठी, झाडे लावण्यासाठी व वयोवृध्द आणि लहान मुलांकरीता जागेचा विकास करण्याची मागणी नागरीकांनी केलेली आहे.

या वॉर्डाचा नगरसेवक म्हणून माझ्याकडे नागरीकांनी आक्षेप अर्ज दिलेला आहे. लेआऊट मधील रहिवाश्यांचा प्रथम हक्क तेथील खुल्या जागेवर असता व त्यांचे सहमतीशिवाय इतरांना खुली जागा देता येत नाही. त्यामुळे नागरीकांची हरकत व आक्षेप लक्षात घेता व स्थानिक नागरीकांसाठी खुल्या जागेचा वापर करण्यासाठी, कोणत्याही संस्थेस सदर खुली जागा देण्यात येऊ नये. तसेच **स्थायी समिती ठराव क्र.४९५ दि.३१/३/२००८ रद्द करावा.** करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**सुचक : सर्वश्री-सिताराम सुरे , संजय जोशी, दत्ताभाऊ पाथीकर, सौ.अल्पा जैन, सौ.मीमीन सफीया फिरदौस**

**अनुमोदक : सर्वश्री-सतीश कटकटे, नारायण कुचे, मोहन मेघावाले, रविकांत गवळी, जावेद हसनखान, कचरू मोरे**

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स.नं.१९४/१ मयुरपार्क, जाधववाडी या मंजूर रेखांकनातील खुली जागा "दर्शन हेल्थ क्लब" या संस्थेला भाडेतत्वावर देण्यास ले-आऊटमधील १५ भुखंड धारकांपैकी १२ रहिवश्यांचा आक्षेप असुन त्यांनी जागा देण्यासंबंधी कुणासही ना हरकत दर्शविलेली नाही. त्यामुळे नागरीकांची हरकत व आक्षेप लक्षात घेता व स्थानिक नागरीकांसाठी खुल्या जागेचा वापर करण्यासाठी, कोणत्याही संस्थेस सदर खुली जागा देण्यात येऊ नये. तसेच स्थायी समिती ठराव

क्र.४९५ दि.३१/३/२००८ रद्द करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५३ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड-ड प्रभागाचे घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २००० अंतर्गत साफसफाई साठी तीन (३) विभागात अे, बी, सी असे विभाजन करून दि. ०१ सप्टेंबर २००६ पासून खाजगीकरणाच्या माध्यमातून खालील कंत्राटदारांना १ वर्षासाठी कंत्राट देण्यात आले होते.

| विभाग | साफसफाईसाठी कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदारांना द्यावयाची एकुण रक्कम/प्रतीमाह |
|---|---|---|
| अ | ईश्वरलाल खरे | रू. ३,३६,३०२/- |
| बी | मोना लेबर सप्लायर्स | रू. ३,९३,६८३/- |
| सी | सेंटर फॉर डेव्हलपमेंट | रू. ३,७९,४३१/- |
| | एकुण .. | रू.११,०९,४१६/- |

वरील कंत्राटदारांची मुदत दि.३०.६.२००८ रोजी संपलेली असून वॉर्ड-ड मधील वॉर्ड अधिकारी व स्वच्छता निरीक्षक यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार वरील कंत्राटदाराचे काम हे दि.०१.७.२००८ ते ३१.०७.२००८ या काळात सुरू होते. करीता दिनांक ०१.७.२००८ ते ३१.७.२००८ या एक महिन्याच्या कामाला कार्योत्तर मंजुरीस्तव मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड-ड प्रभागाचे घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २००० अंतर्गत साफसफाई साठी तीन (३) विभागात अे, बी, सी विभाजन केलेल्या भागात खाजगीकरणाच्या माध्यमातून खालील कंत्राटदारांचे काम दि.०१.७.२००८ ते ३१.०७.२००८ या काळात सुरू असल्याने या एक महिन्याच्या त्यांचेकडून करून घेण्यात आलेल्या कामाला कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

| विभाग | साफसफाईसाठी कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदारांना द्यावयाची एकुण रक्कम/प्रतीमाह |
|---|---|---|
| अ | ईश्वरलाल खरे | रू. ३,३६,३०२/- |
| बी | मोना लेबर सप्लायर्स | रू. ३,९३,६८३/- |
| सी | सेंटर फॉर डेव्हलपमेंट | रू. ३,७९,४३१/- |
| | एकुण .. | रू.११,०९,४१६/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"राष्ट्रगीता"नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद